# मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना 'समर इंटर्नशिप'मध्ये संधी

**पुणे, ता. १८ :** 'एक्सायटिंग सायन्स ग्रुप'तर्फे राबविण्यात येणारा 'समर इंटर्नशिप प्रोग्रॅम' हा विज्ञानविषयक उपक्रम नुकताच झाला. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (एनसीएल) आणि 'आयसर' या संस्थांतील हौशी वैज्ञानिकांच्या वतीने हा उपक्रम घेण्यात येतो. यात महापालिकेच्या विद्यानिकेतन शाळांमधील हुतात्मा बालवीर शिरीषकुमार विद्यालय आणि के. सी. ठाकरे विद्यानिकेतन या शाळांतील ३ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यांना १५ एप्रिल २०१६ ते १४ जून २०१६ या कालावधीत प्रयोगशाळेत (एनसीएल) काम करण्याची संधी मिळाली. या उपक्रमाचे हे दुसरे वर्ष होते. मुलांमध्ये विज्ञानाविषयी आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम घेण्यात आला. त्यातून मुलांना संशोधन म्हणजे नेमके काय, शास्त्रज्ञ प्रयोगशाळेत कसे काम करतात, पीएचडी कशा प्रकारे केली जाते, अशा अनेक प्रश्नांची उकल झाली.